तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

www.prabhutarun.com

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर

मयुरा नायक

संजना कोठारे

वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया



**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तीकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य

**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक



**वर्ष ८६ वे) प्रभुतरुण मुंबई, बुधवार, ता. १६ माहे मार्च, सन २०११ (अंक ९८०**


*संपादकीय*

## पांडुरंग पांडुरंग.....

**-सुहासिनी कीर्तिकर**

प्रभुतरुणाची पंच्याहत्तरी थाटात साजरी झाली ते वर्ष संमिश्र भावनांचं होतं. ‘निवडक प्रभुतरुण’ पुस्तकाचे प्रकाशन, प्रकाशन समारंभात दिंडी, खुल्या मैदानात स्मरणात राहील असा युवामंचच्या तरुणांचा बेहोशी आणणारा कार्यक्रम, ‘रंगशारदा’त अंबिका धुरंधरांच्या अध्यक्षतेखाली विहंगलिखित-अनुवादीत इंग्रजी नाटुकलं आणि इतर बहारदार कार्यक्रम यांची यावर्षी रेलचेल होती. याच दरम्यान डॉ. सदाशिव गोरक्षकरांनी एक प्रस्ताव मांडला होता. भविष्यकाळात नजर ठेवून पाठारे प्रभु ज्ञातीसाठी काय करता येईल; वर्तमानकाळात डोकावून पाठारे प्रभुंचे जागतिक पटावर स्थान कोणते; याचा आढावा घेऊन या सर्व वार्षिक गजबजत्या उत्साहाला वैचारिक अधिष्ठान लाभावे- असा तो प्रस्ताव. दरम्यान काळाने आपले दान टाकले आणि ‘प्रभुतरुण’कर्तेधर्ते असलेल्या सुहास कोठारेंचे निधन झाले. म्हणूनच मी सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे ‘संमिश्र भावना’! मात्र हा वैचारिक परिसंवाद ठरल्याप्रमाणे घ्यायचाच असं सुहास कोठारेंचे सख्खे मित्र विहंग नायक यांनी ठरवलं. विहंग संपादक होते. मित्र आणि संपादक या नात्यानं ही जबाबदारी त्यांनी पेलली. या परिसंवादाला चांगला प्रतिसाद लाभावा आणि वर्षभराची सांगता चांगली व्हावी म्हणून ९९ साली एक आनंदमेळाही त्याच परिसंवादानंतर अंधेरीच्या ज्ञातीसंकुलात भरला. परिसंवाद, आनंदमेळा इत्यादीच्या आखणीत मी कार्यकारी संपादक म्हणून सहभागी होते. दीपक धैर्यवान यांच्या राहत्या जागेत जवळजवळ दर रविवारी आमच्या कार्यकर्त्यांच्या सभा होत. विहंगचे सम्मित्र श्री. पांडुरंग कोठारे त्या सभांना हजर असत. जागेची तपासणी, सुरुवातीची रथयात्रा कशी काढायची, त्याप्रसंगी काय काय लागेल या बाबतीतल्या चर्चेत पांडुरंग कोठारेंचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य होते.. थोडे इकडे तिकडे केल्यावर मोकळ्या जागेत आखणी करायला जाण्यापूर्वी विहंग गमतीने त्यांना म्हणत, ‘चला पांडोबा, आपल्या कुरुक्षेत्रावर!’ पांडुरंगाचे तत्काळ उत्तर असे, ‘हो, हो; चला धर्मक्षेत्रावर!’ दोघांचेही ते धर्मक्षेत्रच होते म्हणा! पांडुरंग कोठारेंनी तयार केलेला रथआणि इतर शोभिवंत गोष्टी आजही स्मरणात आहेत. भारतीय गणराज्य दिनाला (प्रजासत्ताक दिनाला) दिल्लीत महाराष्ट्राचा रथ सातत्यानं लक्षवेधी ठरला आणि पारितोषिक मिळवून गेला. त्याच्या कारागिराने, कलावंताने केलेला रथ स्मरणात राहणारच. पांडुरंगरावांनी ज्ञातीतील अनेक संस्थांना

(पान २ कॉलम १ वर)

**शालांत, उच्च माध्यमिक आणि पदवी, पदविका परीक्षेला बसणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना मन:पूर्वक शुभेच्छा. यश तुम्हा सर्वांची सतत पाठराखण करो.**

**-संपादक**

*विस्तारीत संपादकीय*

## प्रेम कुणावरही करावे

**-मिनाक्षी जयकर**

नुकताच २७ फेब्रुवारी येऊन गेला. आता तुम्ही म्हणाल, ‘त्यात काय विशेष? दरवर्षीच २६ तारखेनंतर २७ फेब. येतो.’ पण या वर्षीचा २७ फेब्रुवारी नक्कीच खास होता. वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कवी कुसुमाग्रज यांचा हा जन्मदिवस. आज ते हयात असते तर यंदा शंभर वर्षांचे होते. त्यांच्या जन्मशताब्दीवर्षाची सुरुवात सर्वत्र अनेक कार्यक्रमांनी साजरी झाली. त्यापैकी एक मुंबईच्या मराठी साहित्य संघातला. तसं शिरवाडकर-साहित्य संघ हे नातं जुनंच. साहित्य संघाच्या डॉ. अ. ना. भालेरावांनी मागे लागून लागून सुरुवातीच्या काळात वि. वा. शिरवाडकरांना नाटकं लिहिण्यास भाग पाडले. शिरवाडकर हे मुंबई मराठी साहित्य संघाचे नाटककार होते. साहजिकच या कार्यक्रमात त्याच्या बऱ्याच जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. त्यांच्याबद्दल सांगताना जयंतराव साळगावकरांनी फार सुंदर उपमा दिली. ते म्हणाले, ‘कुसुमाग्रज हे आकाशातल्या चंद्राप्रमाणे होते. (त्या आधीच्या भाषणात कुणी त्यांना आकाशात तळपणाऱ्या सूर्याची उपमा दिली होती.) -शीतल, शांत. आपण रस्त्याने चालत असलो की चंद्रही आपल्याबरोबरच चालतोय असं वाटते. तो आपला सोबती असतो. त्याप्रमाणे शिरवाडकरांची साथ होती. त्यांच्या कवितेची सोबत होती.’ खुद्द शिरवाडकरांच्या शब्दात सांगायचं झालं तर,

विजयासाठी कविता माझी कधीच नव्हती
म्हणून नव्हती भीती तिजला पराजयाची.’

अशा या कुसुमाग्रजांचा जन्मदिवस हा जागतिक मराठी दिन म्हणून साजरा केला जातो. तसंही मनसे इफेक्टमुळे म्हणा किंवा अन्य काही कारणाने म्हणा, सध्या मराठी शिकण्याची लाट आली आहे. आमीर खान, नासिरुद्दीन शहासारखे दिग्गज नटही मराठी शिकू लागले आहेत. मग सामान्यांनी का मागे रहावे? आमीर खान एका पोलिसांसाठीच्या कार्यक्रमात मराठीतून बोलल्याचे पाहून एका डीसीपीच्या मुलांनाही मराठी शिकण्याची इच्छा झाली. डीसीपीच्या सेक्रेटरीचा प्रथम फोन आला. डीसीपी मराठी; पण त्याची मुलं इंग्रजी माध्यमात शिकलेली. त्यांना त्यांचं मराठी सुधारायचं आहे, व्याकरण, शुद्धलेखन शिकायचं आहे, असं सांगितलं. प्रत्यक्षात त्यांना भेटल्यावर पहिल्या दिवशी निघता-निघता तो मुलगा हळूच म्हणाला, ‘मी युपीएससी परीक्षेला बसतोय म्हणून मला मराठी शिकायचं आहे.’ म्हटलं, ‘ठीक आहे. अभ्यासक्रम काय आहे? प्रश्नपत्रिकेचं स्वरूप काय आहे?’ तर त्या मुलाला काहीच कल्पना नव्हती. परीक्षा ऑक्टोबरमध्ये आहे एवढंच ठाऊक. नंतर दोनचार दिवसांनी त्याने एक अभ्यासक्रम माझ्या हातात ठेवला. गेल्या वर्षीचा एक पेपर त्याच्या लॅपटॉपवर दाखविला. दोन्ही बघून मी तर लटपटलेच! एमएच्याही वरच्या पातळीवरचा तो अभ्यासक्रम होता. मनात म्हटलं, मराठी माध्यमातून शिकलेल्यांकरतासुद्धा अतिशय अवघड असा हा अभ्यासक्रम आहे आणि हा मुलगा तर इंग्रजी माध्यमातला. मराठीशी फक्त

(पान २ कॉलम ३ वर)

पान १ कॉलम २ वरून

आपपरभाव मनात न ठेवता मार्गदर्शन केले, सहकार्य केले. पुढे विहंग गेल्यावर प्रभुतरुणाशी असलेले जिव्हाळ्याचे नाते त्यांनी निरलसपणे चालू ठेवले ते याच वृत्तीनं.माझ्या एखाद्या लेखावर ते आवडल्याची प्रतिक्रिया द्यायचे. केवळ 'प्रभुतरुणा'तील लेखावरच नव्हे; इतरत्र प्रकाशित झालेल्या लेखांवरही. असा संवाद साधणे महत्वाचे असते. संपदा जोगळेकरांच्या पुस्तकावर मी 'ललित'मध्ये लिहिले. पांडुरंगरावांचा फोन. मग संपदाबद्दलच्या त्यांच्या आठवणी, लेखाबद्दल प्रतिक्रिया. 'प्रत्युष'च्या पहिल्या कार्यक्रमानंतर तर कितीतरी वेळ ते भारावून फोनवर बोलत राहिले. म्हणाले, 'त्या समारंभात विहंग कुठेतरी वावरत आहे असेच वाटत होते.' मग युवामंचच्या कलाकारांचं कौतुक. नुसतं कौतुक नव्हतं,तर विश्लेषणही. म्हणजे मंच कसा अपुरा पडला किंवा छोट्या मुलांनी कशी बहार आणली, श्रद्धा आणि मयुराची लावणी किती व्यावसायिक मंचावरची होती, मिथील कसा पुढे जात राहील वगैरे वगैरे. त्याच्यातला 'प्रभुतरुणा'चा हितचिंतक, एक व्यावसायिक कलाकार आणि एक रसिक प्रेक्षक अशावेळी एकाचवेळी अनुभवास आला. 'प्रभुतरुणा'च्या वर्धापनदिनालाही या कलाक्षेत्रात सातत्याने वर्धमान असणाऱ्या कलावंताने अध्यक्ष म्हणून हजेरी लावली. (लेखी निमंत्रण नाही म्हणून थोडी नाराजीची हजेरी घेतली! पण आवश्यकच होते ते. अशातूनच आमच्यासारखा कार्यकर्ता घडतो ना!)

पांडुरंग कोठारे यांचे नेपथ्य हा खूप खूप बोलण्यासारखा वेगळा विषय आहे. आपल्या तारुण्यात आस्वादलेल्या कलाकृती मनात चिरकाल ठसा उमटवतात. मला आठवतंय, माझ्या उमेदीच्या वयात मी पाहिलेलं 'अश्रूंची झाली फुले' नाटक. पणशीकर, घाणेकर यांची अप्रतिम जुगलबंदी असलेला अभिनय, प्राध्यापक विद्यानंद आणि लाल्या विद्यार्थी यांचे शिक्षक-विद्यार्थी अनुबंध आणि नाट्याचा कळस गाठणारा शेवट त्यात होता. या कळसाध्यायात शेवटी होते विमानतळाचे नेपथ्य. दूरवर लुकलुकणारे दिवे, विमानांची पार्श्वभूमीवर येजा आभासित आणि विश्रामधामाच्या प्रांगणात असलेली आधुनिक सफाईदार मांडणी. केवळ अप्रतिम. हे नेपथ्य होते पांडुरंग कोठारे यांचे. अवघड आणि अप्रतिम. नेपथ्यात तरी त्याकाळी दोनच नावे गाजत होती- रघुवीर तळाशीकर आणि रघुवीरपुत्र असलेले पांडुरंग कोठारे! या नेपथ्यकारानं आपला कलावंताचा परीसस्पर्श अनेक नाटकांना केला. नाटकाचं सोनं झालं. अनेक नाट्यगृहे, रंगमंच ही पांडुरंगरावांच्या परीसस्पर्शानं झळाळती होऊन महाराष्ट्रभर विखुरलेली आहेत. महाराष्ट्राच्या पन्नास वर्षांच्या परिपूर्तीनिमित्ताने या कलाकारांचा गौरवही झालेला आहे. असा गौरवशाली कलावंत आपल्या ज्ञातीत जन्माला यावा अन् त्याच्या मार्गदर्शनाचा, सुहृद भावनेचा मला आणि माझ्या संस्थेला वरदहस्त लाभावा हा माझा गौरवच.

त्यांना त्याच्या सर्व सृजनशील कलाकार्यात सदैव साथ होती ती सुशीलावहिनींची. हसतमुखाने त्या सावलीसारख्या पांडुरंगरावांच्या सोबत असत. त्यांच्या कार्याला 'मम'म्हणत. वहिनींच्या केसात असायचे ओवळीचे अनेक सर. घमघमते. त्यांच्या सहजीवनाचेच ते प्रतिक होते जणू. पांडुरंग कोठारेंच्या माझ्या अन् प्रभुतरुण संदर्भातल्या आठवणी त्या ओवळीच्या सरांसारख्याच मनात कायम घमघमल्या राहणार आहेत. कधी प्रसंग येईल, कार्यक्रम होईल तेव्हा या आठवणींना उजाळा देऊन मन म्हणत राहील, 'पांडुरंग, पांडुरंग....!'

(टीप:- याच अंकात डॉ. सुनील राणे यांनी लिहिलेला लेख आहे. त्यामुळे श्री. सुनील कोठारे, अनिता कोठारे यांचा इथे उल्लेख केला नाही. गैरसमज नसावा.)

●


**Statement about ownership and other particulars about news paper**

**PRABHU TARUN**

**Form IV (See Rule 8)**

**To be published in the first issue after the last day of March**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Place of Publication | : | B3 Parijat Patel Estate, Jogeshwari, Mumbai-400 102. |
| 2) | Periodicity of Publication | : | Monthly |
| 3) | Printers Name | : | Smt. Suhasini kirtikar |
| 4) | Address | : | Same as above |
| | Editors Name | : | Smt. Suhasini kirtikar |
| | Nationality | : | Indian |
| 5) | Address | : | Same as above |
| | Name & Addres of Individuals who own the News Paper and Partners of Sharehold holding more than one Percent of Capital. | : | Board of Trustees Prabhu Tarun |

I Smt. Suhasini Kirtikar hereby declare that particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**Suhasini Kirtikar**

Signature of Publisher


पान १ कॉलम ४ वरून

अक्षरओळख. ह्याला हे शिवधनुष्य कसं पेलणार? एकवेळ शिवधनुष्य पेलणं शक्य होईल पण हा अभ्यासक्रम फक्त जेमतेम सहा महिन्यात तयार करणं ही त्या मुलाकरता अशक्य कोटीतली गोष्ट होती. सध्या युपीएससीला बसणं हे लोण मराठी माणसातही पसरू लागलंय ही कौतुकास्पद बाब आहे. पण म्हणून काय कोणी अंथरूण न बघताच पाय पसरावेत? मी माझ्या परीने त्याला विषयाची गहनता समजावयाचा प्रयत्न केला. कितपत समजला कोण जाणे? असेच काही दिवस गेले. चार बैठकांनंतर त्याने दुसरा एक पेपर मला दाखवला. हा पहिल्यापेक्षा खूपच सोपा होता. तो मुलगा म्हणाला, 'आधी दाखवलेला पेपर हा मराठी विषयाचा असला तरी तो ज्यांचा मुख्य विषय मराठी असेल त्यांच्याकरिता आहे.' ह्या मुलाने दुय्यम विषय म्हणून मराठी भाषा घेतली होती. त्यामुळे ह्याला बारावीपर्यंतचाच अभ्यासक्रम अपेक्षित होता. ऐकून मला जरा हायसं वाटलं. म्हटलं, आता जरा आशा आहे.

कुसुमाग्रजांची एक कविता आहे,

प्रेम कुणावरही करावं
प्रेम राधेच्या वत्सल स्तनावर करावं प्रेम
कुब्जेच्या विद्रुप कुबडावर करावं
भीष्म द्रोणाच्या थकलेल्या तीर्थरूप
चरणांवर करावं
दुर्योधन कर्णाच्या अभिमानी
अपराजित मरणावर करावं
प्रेम कुणावरही करावं

खरंच आहे ते! प्रेम कुणीही कुणावर करावे. मग ते मराठी भाषकांनी आपल्या मातृभाषेवर करावे किंवा अमराठी भाषकांनी मराठी भाषेवर करावे. मराठी माध्यमातून शिकलेल्यांनी मराठीवर करावे किंवा इंग्रजी माध्यमवाल्यांनी मराठीवर करावे. मग ते एक परीक्षा पास होण्यापुरते का असेना? इंग्रजी माध्यमातून शिकलल्याने युपीएससीसारख्या परीक्षेत मराठी विषय घेऊन मराठीतून उत्तरे लिहिण्याचा प्रयत्न करणे कौतुकास्पद नाही का? म्हणूनच म्हणते,

'प्रेम कुणावरही करावे.....'

## खाऊगिरी

## शिंगड्या

-सौ. मनिला अनिल राव

**१) शिंगड्याचे पुरण:-**

*साहित्य:* २ कप दुध्याचा किस, १ कप साखर, १/४ कप मावा, २ टीस्पून वेलची, व जायफळ पूड

*कृती:* दुध्याच्या किसाला एक वाफ देऊन त्यात साखर घालावी. घट्ट होत आला की त्यात वेलची पूड व मावा घालून गॅस बंद करावा व थंड करावा.

**२) साठ्याच्या शिंगड्या:-**

*साहित्य:* २ कप मैदा, ४ टेबलस्पून तूप, १/४ टीस्पून सोडा/बेकिंग पावडर, ४ टीस्पून कॉनफ्लॉवर, मीठ चवीनुसार, लाटायला तांदूळ पीठ.

*मुख्य कृती:* २ कप मैदा, २ टेबलस्पून गरम तूप, १/४ टीस्पून बेकिंग पावडर घेऊन त्यात पाणी घालून घट्ट मळावं व खूप मळल्यानंतर त्याचे सहा गोळे करावे.

प्रत्येक गोळ्याची एक पोळी लाटावी. प्रथम एक पोळी घ्यावी. त्यावर कढंत तूप घालून चोळून घ्यावे. नंतर ते थंड करावे व कॉनफ्लॉवर पसरावा व चोळावा.

अशा प्रकारे तीन पोळ्या एकावर एक ठेवाव्या. मग त्याची घट्ट वळकटी करावी. अशाच वळकट्या बाकीच्या तीन गोळ्यांच्या पोळ्या कराव्या व ओल्या कपड्याखाली झाकून ठेवाव्यात. नंतर क वळकटी घ्यावी व तिचे दोन तुकडे करावे. या दोन तुकड्याच्या पोळ्या लाटा. एका पुठ्ठ्याची सरंग्याची राजहंस आकृती करून त्यावर ठेवावी व कापावी.

नंतर एक आकृती खाली ठेवून त्यावर पुरण घालून दुसरी आकृती ठेवावी व काठ पाण्याने बंद करावे. या पोळ्या जाडसर लाटाव्यात. माश्याचा डोळा मनुकाचा करावा व फिनस उरलेल्या पिठाचे आकार देऊन करावे. असे दोन मासे होतात.

नंतर भट्टीत (ओव्हन) मध्ये २०० डिग्री सें., ३० ते ४० मिनिट भाजाव्या.

## पाठारे प्रभु सोशल समाज

पाठारे प्रभु सोशल समाजाचा १२३वा वर्धापन दिन व पुरस्कार वितरण सोहळा गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सोमवार दिनांक ४ एप्रिल, २०११ रोजी खारच्या पाठारे प्रभु को-ऑप. हौसिंग सोसायटीच्या सांस्कृतिक सभागृहात श्री. बन्सी सदाशिव धुरंधर ह्यांच्या अध्यक्षतेखाली सायंकाळी ४ वाजता साजरा होणार आहे. तरी समस्त ज्ञाती बंधूभगिनींनी व पारितोषिक विजेत्यांनी त्या दिवशी हजर राहवे अशी विश्वस्त, अध्यक्ष, उपाध्यक्ष व कार्यकारी समितीची आग्रहाची विनंती आहे.

## नाते आकाशाचे

अदृश्य तरी चिवट रेशमी
धागे स्नेहाचे
धरतीशी हे अतूट जडले
नाते आकाशाचे....
उचंबळे भूहृदयी सागर
विधुबिंब पाहुनी
क्षितिजावरी आकाश जातसे
धरेत सामावुनी
स्थान सोडण्या अपुले उत्सुक
बिंदू चराचराचे....
भूमीवरच्या स्थिर पावलांना
आस पंखांची
अधांतरीच्या झोपाळ्यांना
ओढ पावलांची
आहे त्यात समाधान कधी
नाही कोणाचे....
पाण्यावरची वाफ जातसे
उंच उंच उडुनी
पर्जन्याच्या धारा येती
शोधित वेगे धरणी
आकाश सुखावे हुंकार घेऊनी
तृप्त धरतीचे....

-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर




# ‘हस दे तू!’

## अँथनी गोंन्साल्वीस

Wait. wait. wait.

You see the whole country of the system is juktaposition by the hemoglobin in the atmosphere because you are sophisticated rhetorician, intoxicated by the exuberance of your own verbocity.

Whaaaaat?

अमिताभ बच्चन ईस्टर एगमध्ये बसून येतो. काळा लाँगकोट, पँट, काळा बो, काळी टॉप हॅट आणि हातात पांढरे शुभ्र मोजे. एका हातात काळी छत्री, डोळ्यावर काळ्या फ्रेमचा चष्मा आणि तोंडावर मिष्किल हास्य. क्लबमध्ये सर्वजण जमले आहेत. अमिताभ एगमधून बाहेर येतो. सुरुवातीलाच अत्यंत जलद गतीने, वर दिलेले एक निरर्थक लांबलचक वाक्य म्हणतो ज्याचा कोणालाच अर्थबोध होत नाही आणि सर्वजण ओरडतात.Whaaaaat?

माय नेम इज अँथनी गोन्साल्वीस
मै दुनियामे अकेला हूँ
दिलभी है खाली, घर भी है खाली
इसमे रहेगी कोई किस्मतवाली
अरे जिससे मेरी याद आये, जब चाहे चली आये
रुपमहल, प्रेमगली, खोली नंबर चारसोबीस

अमिताभ कोट उघडून आत लिहिलेला ४२० नंबर दाखवतो आणि थोडं हसून `Excuse me please!'

परवीन बाबी तिच्या बॉडीगार्ड बरोबर क्लबमध्ये आली असते, जो तिच्या वडिलांनी तिच्यावर लक्ष देण्यासाठी नेमलेला असतो. तिचं अमिताभवर प्रेम असतं. पण घाबरून ती ते उघडपणे व्यक्त करू शकत नाही.

अभी अभी इस जगहपे एक लडकी देखी है
जो मुझे इशारे करती है पर किसीसे शायद डरती है
प्यार करेगी क्या डरनेवाली, मेरी बनेगी कोई हिंमतवाली
जो जिससे मेरी याद आई....खोली नंबर ४२०.`Excuse me please!'

यावेळी कोटाचा मागचा भाग उलटा करून ४२० नंबर दाखवतो आणि मग एक ओशाळवाणं हास्य.

अमिताभची बरीच कॉमेडी गाणी आहेत. उदा. नटवरलाल–एक किस्सा सुनो' किंवा 'मेरे आंगनेमे' 'खयके पान बनारसवाला' पण त्याच्या अनेक गाण्यांपैकी 'अमर अकबर अँथनी' मधील हे गीत सर्वात सरस आहे.

अमिताभचा खट्याळपणा, नायिकेशी सलगी. तिचंही त्याच्याशी चाललेलं गुफ्तगू आणि मध्ये खो घालणारा खलनायक. शेवटी दोघात होणारी हाणामारी सर्वच प्रकार मजेशीर आहे. सुरुवातीलाच आपण त्यातले शब्द शोधणं म्हणजे एक डोकेदुखी होती. सीडी वारंवार ऐकून थोडंफार जवळपास जाऊ शकलो असं वाटतं.

चित्रपट:- अमर अकबर अँथनी
संगीत:- लक्ष्मीकांत-प्यारेलाल
गायक:- किशोरकुमार, अमिताभ
गीत:- आनंद बक्षी
कलाकार:- अमिताभ, परविन बाबी, युसुफ खान

## कुंजवनाची सुंदर राणी....

चित्रपट:- अग बाई अरेच्या!
संगीत:- अजय-अतुल
गीत:- श्रीरंग गोडबोले
स्वर:- अजय गोगावले. अमेय दाते, विजय प्रकाश, योगिता गोडबोले, बेला सुलाखे
प्रमुख भूमिका:- संजय नार्वेकर (श्रीरंग देशमुख-रंगा)
दिलीप प्रभावळकर (रंगाचे वडील)
रेखा कामत (आजी)
प्रियांका (रंगाची बायको सुमन)
दिग्दर्शक:- केदार शिंदे

हा चित्रपट `What women want' या हॉलीवूडच्या चित्रपटावर आधारित आहे. पण या चित्रपटाची सही सही नक्कल न करता त्यातील मध्यवर्ती कल्पनेवर केदार शिंदे याने एक खुमासदार चित्रपट सादर केला आहे. श्रीरंग एक साधा सरळमार्गी तरुण. घरी बायको, बहीण, आई, आजी आणि ऑफिसमधली बॉस या सर्व स्त्रिया आपल्या आयुष्यावर वर्चस्व गाजवताहेत असं त्याला वाटतं. या स्त्रियांच्या मनात असतं तरी काय, हा त्याला पडलेला मोठा प्रश्न. गावी जत्रेला जाऊन आल्यावर श्रीरंगला दैवी शक्ती प्राप्त होते. स्त्रियांच्या मनातलं तो ओळखू शकतो. एस. टी.मध्ये सुमन, रंगाची बायको रंगाच्या खांद्यावर मान टेकून झोपी जाते. तिचं स्वप्नरंजन सुरू होते, ते रंगाला कळतं.

हे एक Parody Song आहे. पण नेहमीच्या प्रकारात लोकप्रिय गाण्याचं संगीत, चाल तशीच ठेवून फक्त शब्द बदलले जातात. येथे गाणी स्वतंत्र आहेत. पण वेगवेगळ्या काळातील संगीत, संगीतकार आणि त्या त्या काळातील कलाकार यांच्या शैलीचे अनुकरण करून एक सुंदर विनोदी गीत अजय-अतुल या जोडीने आपल्यासमोर पेश केले आहे.

पडद्यावर प्रभातची तुतारी वाजताना दिसते आणि आपण पार 'राजा हरिश्चंद्र'च्या कृष्ण-धवल जमान्यात जाऊन पोहोचतो. मोठ्या राजवाड्याचा देखावा. रंगा महाराजाच्या वेषात. लांब केस, डोक्यावर मुकूट, भरदार मिशा, रत्नजडीत आभूषणं. सिंहासनावर येऊन बसतो. मुकूट काढून मदिरेचा चषक रिचवतो.

१) रंगा- कुंजवनाची सुंदर राणी, रूप तुझे ग अंतर्यामी
चांदण राती अशा एकांती, मनसागर उसळ मिलनाची उर्मी
सुमन- (रंगाची बायको) लखलख चंदेरी आभाळ होते, माझ्या मनीही प्रीत जागले
प्रियतम भेटाया तुज आले मी..कळलं का?

अजयने एका वेगळाच खर्जातला आवाज लावला आहे आणि त्यानंतर 'लखलख चंदेरी....उंच टिपेचा प्रेयसीचा आवाज ही एक विलोभनीय तफावत.

२) सुमन- मेघ सावळा माझा राया, भोळा भाबडा माझा राया
माझ्यावरी त्याची आभाळाएवढी माया- माझा राया ग
मर्दानी छातीचा माझा राया, मोठ्या मनाचा माझा राया
माझ्यावर डोंगराएवढी माया- माझा राया ग
रंगा- माझं काळीज तू माझी हरिणी, तुझं रूप हे नक्षत्रावाणी
या संसाराला देवाजीची छाया ग

ह्या कृष्णधवल दृश्यात आपण 'साधी माणसं'च्या जमान्यात जातो. रंगाची बायको गुरांना चारा घालते, विहिरीवर पाणी भरते, आई चूल फुंकते, बाप चिलीम ओढतोय. रंगा मर्द मराठ्याच्या वेषात आपल्या बायकोचं कौतुक करतो. वास्तवात असणारी सर्व कुटुंबीय या स्वप्नरंजनात असतात.

३) या कडव्याच्या सुरुवातीला घोड्याच्या टापांचा ठेका ऐकू येतो जो ओ. पी. नय्यरच्या संगीताची आठवण करून देतो. रंगा आणि त्याचे मित्र सायकलीवरून येताना दिसतात. रमेश देव, काशिनाथ घाणेकर यांच्या चित्रपटांची आठवण होते.

रंगा- मन माझे उमलून गेले, स्पर्श तुझा झाला
प्रितीचा बहर बघ आला, हा वेड लावून गेला
होतो मी एक अनामिक व्यर्थ भटकलेला
तू आलीस अन् जगण्याला अर्थ नवा आला
प्रितीचा बहर बघ आला, हा वेड लावून गेला

४) दादा कोंडको स्टाईल
सुमन- मक्याच्या शेतात एकटीच होते ठाऊक नव्हते कुणा
अरे उभ्या पिकांमंदी आडवा घुसतोय, हाय कोन ह्यो पाहुणा

रंगाची बायको डोक्यावर कणसाची टोपली घेऊन शेतात उभी असते. रंगा हवालदाराच्या वेषात येतो.

५) उंच उंच कारंजे उडतायत. त्यावर रंगीबेरंगी प्रकाशझोत पडत आहेत. रंगा आणि सुमन दोन्ही बाजूंनी धावत येत जोडीनं नृत्य करतात. सचिन, महेश यांची आठवण करून देतात.

रंगा- तुझ्या प्रितीत झालो खुळा, तुझ्यावाचून न करमे मला
सुमन- माझ्या श्वासात तू, माज्या स्वप्नात तू
तरी कारे सख्या दूर तू.
सजणा याद ही, याद ही छळते तुझी याद रे

येथे रंगा एका मोठ्या पेटाऱ्यातून बाहेर पडतो. बागेत फुलांच्या राशीवर दोघे नृत्य करतात. जवळच अनेक तानपुरे ओळीने मांडलेले असतात. पाठीमागे रंगीत धुराचे लोळ फुटतात. जितेंद्र-श्रीदेवी यांच्या नृत्यदृश्याची आठवण होते.

**-नंदकुमार विजयकर**
-nandusuhas03@gmail.com

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



YUVA MANCH
Together Towards Tomorrow

# IT'S ALL ABOUT MONEY, HONEY!

- **Mithil Navalkar**

***About the Writer***

*A double MBA in the field of Marketing and Finance Mr. Mithil Navalkar has been in this dynamic and varying world of finance since 5+years. He has done his MBA from Chetnas Khandelwal Institute of Research and Management and MET respectively. He has also done his Diploma in Marketing Management prior to his MBA.*

*His career graph started with a wealth management company viz. Religare Macquarie, wherein his profile included portfolio management about wealth management for High Networth Individuals. Further he worked with SMC Insurance brokers Pvt. Ltd. as an AVP of Direct Marketing Channel (Life Insurance), Mumbai.*

*At present Mr. Mithil Navalkar is exploring his financial skills at S.K Investments (Praxis Insurance), an Investment &Insurance Solutions company. His profile is that of a Business Development Manager, for Mumbai and ROM for insurance vertical. His responsibilities include the expansion of life and general insurance channel for the broking firm. As a BDM his target is to achieve business growth and manage the business financials. Apart from this he is also responsible to recognize new business opportunities and develop inventive schemes for further growth. Building and fostering strong client relationships as well as developing business capabilities among team members are also a few key tasks he is responsible for.*

*In the article followed, he has shared his views and opinions about the financial industry.*

Buy buy buy!! Sell sell sell!! Average out positions! Stocks going up or stocks going down?! How does the market look today? What is the inflation rate this week? What is G-Sec. rate? Are oil prices going up yet again...What is the government doing about it? Shares, Bonds, Debentures, Money Markets, Commodities, Portfolios, Mutual Funds, AUM, NAV, Risk, Repo rate, Reverse repo Rate, Net yield, IR, ROR, PLR, SLR Insurance, Re – insurance . . . . . . . . .

What is this all about...? IT'S ALL ABOUT MONEY, HONEY!

Yes, it is all about Money, Finance, and the Finance Industry. It is that big 'F' which runs this whole economy!!!!!! Interesting????? I am sure it is! Confusing???? Well I am sure it is!

This is the ever expanding never dying Financial Industry. It is so vast, just when you think you know it all there will always be something more to know, to learn and to explore. At least that's how I feel after starting my career in the industry a short while ago.

Having said that let me put down some of my learning from this industry for those who aspire to be a part of it or for those who are considering this industry as one of the options to begin their careers with.

Indeed, this industry is fairly an easy industry to get in but carving out a long viable career can often get tough and I mean really tough! It's been a modest five years for me in this industry gaining experience and knowledge from Brokers to Banks, but I can never know it to the core even after being a part of it 50 years ahead. I hope the little learning I gathered can help young aspirants to view the industry in the right perspective and decide for themselves if it is the right industry to choose.

To start with, there are many different positions in the financial industry which require different mental traits to settle in. If you think you are a knowledgeable persuasive individual and ready to work 6 days or sometimes even 7 days a week you might be a good fit as a registered agent. Registered Agents can guide investors with trading and investment products like shares, bonds, mutual funds insurance etc. As an individual agent one can give exams conducted by Security Exchange Board of India (SEBI) like AMFI certification for Mutual Funds or IRDA (Insurance Regulatory Development Authority) for Insurance. AMFI (Association of Mutual Funds in India) is an apex body of all Asset Management Companies (AMC) which has been registered with SEBI. While IRDA is Insurance regulatory body formed in 1999 to protect the interests of policyholders.

On the other hand, if you are good with numbers, mathematics, analytics, excel spreadsheet and love to get into the financials of a public company then perhaps a career path as an Analyst can be best suited for you. If you think you are good at both number crunching and persuasion then you can as well choose to be a Financial Advisor.

As I had mentioned earlier the industry is so vast that many entering the financial industry don't end their careers in the same position in which they begin. Most use their knowledge and experience from their initial positions and find other positions or job profiles within the industry that suit their interests more. It is therefore very important to understand that the aptitude and the desire to explore different job options would determine the career and success in this industry.

As far as education is concerned a typical four year Bachelor's degree is a must. Bachelor's in Business Administration or Commerce or Economics would be the best course. It offers ample opportunities and more alternatives should one choose to deviate from his initial choice of career path down the line. There are a lot of instances in past and present wherein individuals from different backgrounds have entered the financial industry and have been successful.

One may not need an MBA merely to enter the industry but it can most definitely help in breaking into some of the most prestigious firm's training programs. However, an MBA in Finance or Economics certainly opens a wide range of doors for youngsters, at times later in their career in the industry. Diplomas from big school names may also help in some instances. Going for a part time MBA program can be a good option as well, especially if they have missed the bus immediately after graduation. These days' employers are being more focused on class rank, grade point and practical experience. Certain positions in the industry can also be reached without an MBA, but an MBA would be highly recommended, as preference is usually given to individuals who have had some form of post-graduation study.


Other than an MBA there are various specialized courses like CA(Chartered Accountancy), CFA (Chartered Financial Analyst), ICWA (Institute of Cost and Works Accounts) or CFP (Certified Financial Planner).

Chartered Accountancy course is a professional course in accounting, auditing and taxation conducted by ICAI (Institute of Chartered Accountants of India). This course involves a blend of theoretical and practical training for a period of three years which grooms an individual to be a professional accountant. It is indeed a challenging course and one must always be ready to give more than one attempt to clear different levels to earn the certification. A big corporate to a small business may require the services of a CA for audit and accountancy purpose. A career in chartered accountancy can be a challenging and rewarding option for competent individuals in the finance industry. Another good option for a CA can also be to be self employed.

On the other hand one can consider CFA which is a course conducted by ICFAI (Institute of Chartered Financial Analysts of India). The areas of work for CFA's would be corporate finance, investment management and financial services. Again this course is for those who are very strong on mathematics and analytics. It opens doors to banking, insurance, finance and leasing companies for challenging professional positions with attractive remunerations.

ICWA is a cost accounting course offered by the Institute of Cost and Works Accounts of India (ICWAI). A cost accountant would deal with solely the financial aspects of the company. Right from budgets, cost audit to investment analysis and fund management to guiding the management to take profitable decisions would be a cost accountant's profile. There is immense scope for cost accountants since the demand is huge but professionals are less.

(Cont. on page 5 Col 3)



# प्रभु-ज्ञातीयांचा हिरा हरपला

-डॉ. सुनील राणे

कै. मा. प्रमोदजी कोणाचाही मृत्यूलेख लिहिला तर म्हणत, 'लेखणी जाळून टाकली पाहिजे.' आजही ते हेच म्हणाले असते. कोणावरही साहित्यिक लेख लिहिणे सोपे असते. परंतु आपल्या आत्मीयांवर मृत्यूलेख लिहितांना आपली विचारमालिका बधीर होते. अश्रू ठिबकत, हाताला कंप सुटत लिखाण पूर्ण होते. असे प्रसंग आयुष्यात नकोसे होतात. मा. पांडुरंगजीं व सुशीलाताईंशी, सुनील व सुनिताशी कौटुंबिक जिव्हाळ्याचे नाते. त्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाची यशोगाथा प्रत्यक्ष पाहिली, अनुभवली. त्यामुळे त्यांच्या नेपथ्य, नाट्यमंचाचे, विविध पुरस्कारांचे कौतुक पाहत असताना कोणालाही अभिमान वाटावा. शिवाय अतिशय बोलका स्वभाव. त्यामुळे युवा कलावंतापासून ज्येष्ठ कलावंतांपर्यंत किंवा रंगमंच उभा करणारे पडद्यामागचे कलावंत यांबरोबर शेवटपर्यंत मित्रत्वाचे नाते जपत राहिले. इतकेच नव्हे तर आपला पुत्र 'सुनील' यांनाही आपल्या कलेच्या परंपरेत पारंगत केले आहे.

त्यांच्या जीवन कार्याचा आढावा घेतल्यास मुंबई ते काश्मीरघाटीपर्यंत अनेकानेक सुंदर रंगमंचाची, नेपथ्याची निर्मिती त्यांनी केली. अनेक लोकप्रिय नाटके, अगदी सुधा करमरकरांच्या 'लिटल थिएटर' पासून ते आय. एन. टी., आर्टिस्ट कंबाईन, सुयोगसारख्यांच्या लोकप्रिय नाटकांना सुंदर नेपथ्य करून 'वाहव्वा' मिळविणारे पांडुरंगजी देवाजीच्या स्वर्गाचे नेपथ्य आपल्या सिद्ध हस्ताने निर्माण करण्यासाठी जणू परमेश्वराने त्यांना आमंत्रित केले.पांडुरंगजी गेली ५० वर्षे मराठी, गुजराती, इंग्लिश नाट्य रंगभूमीवर 'नेपथ्य सम्राट' म्हणूनच वावरले. साहित्यसम्राट पु. ल. देशपांडे यांच्या 'वाऱ्यावरची वरात' मधील गावठाणाची अप्रतिम निर्मिती आजही डीव्हीडीमध्ये बंदीस्त झालेली रसिकांना पाहता येते.

त्यांच्या कलासक्त मनाने सुंदर सुंदर नाट्यमंचाची निर्मिती केली. नेपथ्याबरोबर कै. पांडुरंगजींनी आपला पुत्र सुनीलला आपली कला परंपरेने चालविण्यासाठी पारंगत केले. नाट्यगृहाच्या रंगमंचाच्या निर्मितीत प्रामुख्याने पुढील प्रसिद्ध नाट्यगृहे आहेत. रवींद्र नाट्य मंदिर, गडकरी रंगायतन, महाकवी कालीदास नाट्यगृह, हुतात्मा स्मृती मंदिर- सोलापूर, मा. कृष्णराव फुलंब्रीकर नाट्यगृह, जालना, प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृह, शिवडी, मालाड खुले नाट्यगृह, रंगभवन, मुंबईतील कितीतरी लोकप्रिय शाळांच्या सभागृहांचे नाट्यमंच प्रामुख्याने निर्माण केले. त्याचप्रमाणे नागपूर, ठाणे, बोरिवली, गोवा येथील नाट्यमंच, पु. ल. देशपांडे अकादमी, अहमदाबाद, रत्नागिरी, नांदेड. अशी प्रचंड निर्मिती करणारे कै. पांडुरंगजी म्हणजे अभिजात कलावंत होते. तद्वतच अनेक नामवंत आर्किटेक्ट संस्थेत त्यांचा सल्ला मोलाचा मानला जाई. श्री. शशी प्रभू, पानसरे-पंडित, सुभाष आठल्ये, किर्लोस्कर कन्सल्टंटस् यांच्याकडून त्यांच्या अजोड कार्याला प्रसिद्धीची पावतीच मिळाली आहे.

कालप्रवाहाबरोबर रंगमंचाला योग्य अशा यांत्रिकी योजना त्यांनी कार्यान्वित केल्या.

ह्या क्षेत्रात अत्यंत मेहनत करून यश प्राप्त करणारे पांडुरंगजी ज्ञातीवरही तितकेच प्रेम करत. प्रत्येक संस्थेच्या सर्व कार्यक्रमास सपत्निक, सहकुटुंब हजेरी लावून संस्थांना देणगी आवर्जून देत.

पांडुरंगजींच्या कलेची झलक केंद्र सरकारच्या गणतंत्रदिनी होणाऱ्या 'परेड'मध्ये खास दिसून आली. महाराष्ट्राचा चित्ररथ 'हापूस'ला तसेच अनेकदा अनेक पुरस्कार प्राप्त झाले. पाठारे प्रभुची शोभायात्रा १९८३ साली जगभर झाली. त्यात कै. पांडुरंगजीनी निर्माण केलेले बळीराजा आणि धनदिव्याचे चित्ररथ केवळ मुंबईकरांचे नव्हे; तर जगाचे आश्चर्य ठरले. कै. मा. प्रमोदजी नवलकरांनी विश्वासाने सोपविलेली जबाबदारी केवळ १०-१२ दिवसात आपल्या कलागुणांनी सजवून प्रभु संस्कृतीचा ठसा जनमानसावर उमटवला हे विशेष.

कै. काशिनाथ घाणेकर जीवन गौरव पुरस्काराचे ते मानकरी होते. प्रभु-प्रभाताचे कला पुरस्काराचे ते सर्वप्रथम मानकरी होते. अखिल भारतीय नाट्य परिषदेने ज्येष्ठ कला दिग्दर्शक म्हणून त्यांचा खास गौरव केला. आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, गणेश उत्सवात त्यांना परीक्षक म्हणून आमंत्रण असे. विश्वास मेहंदळे यांच्या संस्थेने अलीकडेच 'जीवन गौरव' पुरस्कार प्रदान केला, प्रसिद्धीच्या झोतात असूनही कधीही स्वत:चे कौतुक न करणारे महान कलावंत ह्या जगातून जात नसतात, तर त्यांच्या जीवंत कलेने ते अमर स्वरूपाने आपल्या भोवतीच वावरत असतात.

(Cont. from page 4 Col 4)

Just like a CA a cost accountant can also be self employed.

These days another career option can also be of being a CFP (Certified Financial Planner). This course is totally different from the courses I have already mentioned like CA, ICWA, CFA, MBA etc. It is offered by the Financial Planning Standards Board of India (FPSB) and is mainly for individuals who want to enter the field of financial planning. CFP mainly deals with planning of finances in the area of Investments, Insurance and Taxation. The best part is professionals working in other industries who want to switch their career in financial planning can also go for CFP. The scope again in CFP is huge. Especially in a country like ours where the financial awareness of an average individual is low, the need of a professional portfolio manager is always there. Hence, my take is that in days to come a CFP professional will be the most sought after and a highly paid professional in the area of finance and overall.

All the courses I have mentioned are most common when it comes to either starting a career or jumpstarting your career in the Finance Industry. But I would also like you to make a note of the fact that being an industry of the size that it is; there are still some areas of expertise and specialization that can offer a career path in itself.

For example, if I talk of an individual sector within the financial industry like Insurance it can offer a whole wide range of options and sub options. If I have to make a little mention about the Insurance sector there are different functions which require a specialized set of qualifications, experience and skill set. There are courses for Actuary Management (An actuary is a statistical analyst to determine policy terms and premiums) which is a highly paid job for skilled professionals. Insurance companies these days require services of Money Managers and Securities Research professionals. Various types of Insurance underwriting has also become a specialized profile.

This is why I have earlier mentioned that you do not end your career in the same position you started in the financial industry. There lies a lot of opportunity to move to the areas of your interests in this Whole Interesting World of Finance.

SO THIS IS HOW I PERCIEVE THIS INDUSTRY FROM WHATEVER LITTLE I HAVE SEEN, HEARD AND EXPERIENCED. AND FOR ALL THOSE SEEKING TO GIVE THIS CAREER OPTION A SHOT, A WHOLE WIDE WORLD OF OPPORTUNITIES IS WAITING WITH OPEN ARMS. AGAIN, IT IS YOUR APTITUDE AND DESIRE TO EXPLORE THAT WILL DECIDE YOUR SUCCESS IN THIS EVER CHANGING, NEVER DYING WORLD OF FINANCE.

All the very best!

## प्रतिक्रिया

### Suggested Action Points to P. P. Charities

1) Stop printing coloured photos & save money.
2) Stop doing out free DELICIOUS dinner and save money.
3) Give Medical Insurance cover to the needy. This will give them mental relief-peace of mind.
4) Increase Poverty Relief Fund which at present is peanuts considering the high cost of living.
5) Give financial support to undergraduates also under `Vidhya Bhushan Education Loan Scholarshipì since education for undergraduates in I.I.T. or Medical Colleges is also expensive.

I sincerely hope that due consideration will be given to the above suggestion and acted upon.

Yours truly,

**S. G. Dharadhar**

(टीप:- वरील पत्र पा. प्र. चॅरिटीजला श्री. सिद्धकुमार धराधर यांनी लिहीले आहे. त्यातील त्यांनी मांडलेले संक्षिप्त मुद्दे इथे दिले आहेत. चॅरिटीजच्या सभेत या मुद्द्यांवर विचार होईलच.

**-संपादक**)

## प्रतिक्रिया

I have read the January 2011 issue of Prabhu Tarun & was really impressed by the article " Looking Beyond" by Sanjana Kothare, younger generation co-editor of P.T.

While expressing my views on the above article I should mention that I am a senior citizen & regularly read Prabhu Tarun in Marathi language from the era of Late Shri Suhas Kothare,but I fully support the nature of change narrated by Sanjana Kothare in evoving this News Letter

Prabhu Tarun & that is the reason I am writing this in English instead of Marathi. It is really commendable that a young Pathare Prabhu is keeping him/her at par with Global trends & changes in the world & not lacking behind in competing with the progress of mankind.

A generation gap can be shortened by encouraging the younger generation of Pathare Prabhu"s to do certain creative things in every field of man-kind which will make us & our ancestors proud in "LOOKING BEYOND"

**–Ullhas K. Ajinkya**

## प्रभुतरुणास देणगी

❖ श्री. मंदार माधव नायक यांजकडून त्यांची आई कै. सौ. विमल माधव नायक आणि वडील माधव बाळाराम नायक यांच्या विसाव्या पुण्यतिथीनिमित्त रु. ५००/-

❖ कुमारी अपेक्षा प्रशांत राणे यांच्या CPA (USA) परीक्षेतील उज्ज्वल यशाप्रीत्यर्थ आजी सौ. वृंदा आणि आजोबा श्री. शाम जयकर यांजकडून रु. २५१/-

## अभिनंदन

तीस जानेवारी या दिवसाचा भाग्ययोग काही आगळाच होता. सकाळ आमीरच्या सहवासात गेली. संध्याकाळ माझी वरळीच्या 'जेडगार्डन'वर वेगळ्या दिमाखदार सोहळ्यात रंगली. आपल्या ज्ञातीतील छायाचित्रकार श्री. नंदू धुरंधर यांच्या अनोख्या संकल्पनेचा तो पूर्तीसोहळा होता. मराठीतील कलाकारांना घेऊन त्यांची छबी कॅलेंडरवर त्यांच्या वाढदिवसाप्रमाणे छापत देखणे कॅलेंडर या दिवशी निघाले. फार पूर्वी चारुदत्त सरपोतदारांनी बिस्मिल्ला खान, बालगंधर्व, लता मंगेशकर अशांचे फोटो कॅलेंडरवर आणले होते. पण सर्व मराठी कलाकार अन् तेही आताचे तरुण कलाकार घेऊन असे कॅलेंडर काढावे यासाठी नंदू धुरंधर गेली दोन वर्षे धडपडत होते. राजा-राणी ट्रॅव्हल्सने शेवटी हे कॅलेंडर प्रायोजित केले अन् त्याला एकदम शाही अवतरण मिळाले. जेडगार्डनच्या टेरेसवर सर्वत्र प्रकाशाची झाडे, भाऊ मराठे यांचे निवेदन, कॅलेंडर साकारतानाचे क्षण आणि राजा पाटील यांच्यावर माहितीपट, भारतकुमार राऊत-नीना राऊत यांच्या हस्ते या दैनंदिनीचे प्रकाशन, मंचावर समीर धर्माधिकारी आणि संदीप कुलकर्णींची उपस्थिती यामुळे हा प्रकाशनसोहळा थाटामाटात साजरा झाला. भारतकुमार राऊत, अभिजित पाटील, अरविंद धुरंधर आणि नंदू धुरंधर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अरविंद धुरंधरांनी प्रताप वेलकरांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. नंदू धुरंधरांनी महाराष्ट्र टाइम्स, खासदार भारतकुमार राऊत, राजाराणी ट्रॅव्हल्स आणि सर्व कलाकार यांचे मनापासून आभार मानले. राजेशाही थाटाच्या जेवणाने या सोहळ्याची सांगता झाली. श्री. नंदू धुरंधरांना माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा.

## परीक्षेतील सुयश

कै. रामराव गणपतराव विजयकर आणि त्यांचे सहकारी कै. खंडेराव सदाशिव त्रिलोकेकर यांची पणती कु. मैथिली सतीश प्रधान यांनी लंडन येथील सद्बी विद्यापीठातून आर्ट बिझनेसमध्ये M.A. with merit ही पदवी प्राप्त केली. (या अभ्यासक्रमात आर्टस्‌मधले कायदेकानून, मार्केटिंग आणि रसास्वाद यांचा समावेश असतो.) अभिनंदन.

### बीएचएमएस

डॉ. सोफिया सुजाता शेखर कोठारे, प्रथम वर्ग
डॉ. श्वेताली प्रदीप गजानन विजयकर, प्रथम वर्ग
डॉ. मीताली प्रदीप गजानन विजयकर, प्रथम वर्ग

## अभिनंदन

❖ सौ. मेधा शरद धुरंधर या C-DAC मध्ये समन्वयक म्हणून कार्यरत आहेत. त्यांना नुकताच फिकी (FICCI) पुरस्कार जाहीर झाला. Excellence in Science & Technology साठी हा पुरस्कार श्री. प्रणव मुकर्जी यांच्या हस्ते देण्यात येणार आहे. सौ. मेधा यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

❖ डॉ. सदाशिव गोरक्षकर (पद्मश्री) यांना केंद्र सरकारतर्फे 'रवींद्रनाथ टागोर फेलोशिप' देण्यात आली. अभिनंदन.

❖ सौ. केतकी आणि राजन मोतीराम जयकर हे १९३८च्या ऑस्टिन गाडीतून व्हिंटेज कार रॅलीमध्ये नेहमीप्रमाणे सहभागी झाले होते. त्यात त्यांना तृतीय क्रमांकाचे बक्षिस प्राप्त झाले. त्यावेळी केलेल्या वेशभुषेस प्रथम क्रमांक बहाल झाला. अभिनंदन.

❖ राजन जयकर यांचे 'पाठारे प्रभु' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेच्या निमित्ताने सोफिया कॉलेजमध्ये व्याख्यान झाले.

❖ श्री. प्रसाद विजयसेन कोठारे यांना 'आदित्य बिर्ला ग्रुप'साठी सिमेंट उद्योगात विशेष लक्षणीय कामगिरी केल्याबद्दल 'शायनिंग स्टार: प्रोफेशनल्स' या स्वरूपाचा खास पुरस्कार प्राप्त झाला. ३१ जानेवारी २०११ रोजी पाचशे उमेदवारांमधून निवड होऊन त्यांना हा पुरस्कार बहाल करण्यात आला. हार्दिक अभिनंदन.

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### आत्याबाई नाव बोला

१३-२-११ विवान (प्रियांश) श्रीपाद आगासकर

(चुकीची दुरुस्ती- गेल्या अंकात 'आत्याबाई नाव बोला'मध्ये **अरना अभिजित तळपदे** असे वाचावे)

### नारळ साखर दिला

| | | |
|---|---|---|
| ५-१-११ | श्री. मिथिल चंद्रकिरण नवलकर | कु. सुष्मिता शशांक कोठारे |

### नांदा सौख्यभरे

| | | |
|---|---|---|
| १८-२-११ | श्री. यश आनंद शामराव तळपदे | कु. आश्विनी रमाकांत पाटील (आंतरज्ञातीय) |
| २४-२-११ | श्री. आनंद दिलीप चु. धुरंधर | कु. वृषाली राजीव गो. सबनीस (आंतरज्ञातीय) |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| २४-२-११ | श्री. विजय बाबुलनाथ धैर्यवान | वय ८१ | वांद्रे |
| २८-१-११ | श्रीमती कल्पना जयसेन जयकर | वय ९०, | सांताक्रुझ |

## पाठारे प्रभु महिला समाज

रविवार दिनांक २० फेब्रुवारी २०११ रोजी पाठारे प्रभु को-ऑप. सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात (१२वा रस्ता, खार-प.) येथे डॉ. सौ. मोना शिशिर सिंग यांच्या अध्यक्षतेखाली पाठारे प्रभु महिला समाजाचा ९६वा बक्षिस समारंभ साजरा करण्यात आला.

समाजाच्या अध्यक्षा सौ. वृंदा जयकर ह्यांनी त्यांचे स्वागत केले.

डॉ. मोना ह्यांनी आपल्या भाषणात 'मी पूर्वाश्रमीची गुजराथी आहे. मात्र माझ्या सासूबाई (पूर्वाश्रमीच्या लीना त्रिलोकेकर) ह्यांनी पाठारे प्रभुंचे पदार्थ करायला शिकविले. त्यांच्यामुळे मला उच्च विचारसरणीच्या पाठारे प्रभुंचा सहवास लाभला. त्याचा अभिमान वाटतो.' असे सांगितले.

रौप्य पदक विजेत्या श्रीमती उषा कोठारे , डॉ. सुनील राणे, सौ. माया नवलकर, डॉ. पायल राणे, कु. विनिता नवलकर ह्या भगिनींनी आपले मनोगत व्यक्त केले.

श्रीमती नलिनी तळपदे रचित काव्य, श्री. शेषनाथ पावसकरांनी दिलेल्या सहजसुंदर चाली व श्री. प्रदीप राणे ह्यांच्या तबल्याच्या साथीत सौ. अक्षदा तळपदेंनी आपल्या सुरेल गायनाने कार्यक्रमाला शोभा आणली.

देणगी वाचन, आभार प्रदर्शन व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

या समयी कुल्फीने कार्यक्रमाला 'चव' आणली.

पाठारे प्रभु महिला समाजाचे चैत्रगौरीचे वासंतिक हळदीकुंकू ४ एप्रिल २०११ रोजी पाठारे प्रभु को-ऑप. हौसिंग सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राचे सभागृह, गायत्री मंदिराशेजारी, प्रभुनगर, १२वा रस्ता, खार(प) येथे आयोजित केले आहे.


॥ श्री इंद्रायणीप्रसन्न ॥ ॥ श्री गुरुदेव दत्त ॥



**प्रकास्व कॅटरर्स**

*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*
*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा!*
*विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो. खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :
**प्रवीण धुरंधर**
डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन,
स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.
फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८



**स्वामी समर्थ होममेड फूड प्रॉडक्टस्**

होळी रे होळी, गोरक्षकरांची पोळी,
परभांच्या पोटात गोरक्षकरांची पोळी

**जाहिरात वाचून पटकन् फोन करा व**
**आजच आपल्या तेलपोळी व पुरणपोळीची ऑर्डर बुक करा**

*आमचे इतर दर्जेदार व खुसखुशीत पदार्थ*
**बासमती डाएट चिवडा, मस्का शंकरपाळे (गोड), बेक्ड गोड शंकरपाळे, कणिक मैदा चटपटीत रोस्टेड शंकरपाळे, भाजणीची मेथीपुरी, भाजणीची डाएट चकली, लसूण टोस्ट, वरीचे पीठ आणि बटर स्कॉच लाडू व बरेच काही.**

**केदार गोरक्षकर** ९८१९१७६७९९
**अनघा केदार गोरक्षकर** २२०३२०१०४

वीर विलास, १ला मजला,
४ नवलकर क्रॉस लेन, व्ही. पी रोड,
गिरगाव, मुंबई-४००००४